# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७ /( ३२२/ ०७) विशि-४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) चा कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सत्र २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(विद्या विभाग)**

एम. आय. डी. सी. रोड कॉम्प्लेक्स, गडचिरोली-४४२६०५ फोन नंबर ०७१३२ - २२३३२३

गोंविग/ विद्या /क्र/ 318 /२०२३ // **अधिसुचना** // दिनांक २०/ ६ /२०२३

**प्रति,**

**मा. अध्यक्ष/ सचिव/ प्राचार्य, सलग्नीत सर्व महाविद्यालये,**
**विभाग प्रमुख पदव्युत्तर शैक्षणिक विभाग,**
**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.**

**विषय:- राष्ट्रीय शैक्षणिक धोरण -२०२० ची अमलबजावणी करणेबाबत.**

**संदर्भ:- १. शासनाचे समक्रमांकाचे दिनांक ०६/०६/२०२३ चे पत्र.**
**२. समक्रमांकित शासन निर्णय दिनांक २०.०४.२०२३ व दिनांक १६.०५.२०२३ नुसार.**
**३. उच्च व तंत्र शिक्षण विभाग मंत्रालय विस्तार क्रमांक :- एनईपी -२०२२ / प्र.क्र.०९/ विशि-३ ,दिनांक :-१६ जुन २०२३.**

गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नीत सर्व महाविद्यालये व विद्यापीठातील पदव्युत्तर शैक्षणिक विभागांना कळविण्यात येते की, संदर्भ क्र.२ नुसार दिनांक २०/०४/२०२३ व दिनांक १६/०५/२०२३ च्या शासन निर्णयान्वये पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी नविन शैक्षणिक श्रेयांक व अभ्यासक्रम आराखडयासंदर्भात अमलबजावणीच्या सुचना देण्यात आलेले होत्या. परंतु संदर्भ क्रमांक ३ अन्वये दिनांक ०९/०६/२०२३ रोजी सहयांद्री अतिथीगृह मुंबई येथे सुकाणू समितीच्या झालेल्या सभेमध्ये समितीने केलेल्या शिफारशीनुसार पूर्वीच्या सुचनामध्ये बदल करण्यात येत असुन सुधारीत शिफारशीच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

- **पदव्युत्तर अभ्यासक्रम:** - दिनांक १६ मे२०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार दिलेल्या निर्देशाप्रमाणे सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षापासुन गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नीत सर्व पदव्युत्तर महाविद्यालयामध्ये व विद्यापीठातील पदव्युत्तर शैक्षणिक विभागामध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण- २०२० ची अमलबजावणी करून त्यानुसार विद्यार्थ्यांचा प्रवेश निश्चीत करावा.

- **पदवी अभ्यासक्रम (प्रथम वर्ष):-** संबधित सर्व पदवीच्या प्रथम वर्षाला शैक्षणिक सत्र २०२४-२५ पासुन नविन शैक्षणिक धोरणाची अमलबजावणी अनिवार्य केले जाईल.

करीता सलंग्नीत सर्व महाविद्यालये व विद्यापीठातील पदव्युत्तर शैक्षणिक विभागांनी पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे प्रवेश देतांना वरील प्रमाणे सुचनाचे अवलोकन करून प्रवेश निश्चित करावेत.

**सहपत्र :- वरील प्रमाणे**

(डॉ. अनिल हिरेखन )
कुलसचिव
गोंडवाना विद्यापिठ गडचिरोली

**प्रतिलिपी :** १) मा. कुलगुरु, यांचे स्विय सहाय्यक गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली यांना माहितीस्तव सविनय सादर
२) मा. प्र-कुलगुरु, गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली यांना माहितीस्तव सविनय सादर.
३) मा. कुलसचिव, गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली यांना माहितीस्तव सविनय सादर.
४) मा. वित्त व लेखा अधिकारी, गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली यांना माहितीस्तव सविनय सादर.

(डॉ. हेमंत बारसागडे)
उपकुलसचिव विद्याविभाग
गोंडवाना विद्यापिठ गडचिरोली

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार, कक्ष क्रमांक ४२८,
चौथा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२
दूरध्वनी क्र.०२२-२२७९३१७१ Email ID:- vishi3-hted@mah.gov.in

क्रमांक:- एनईपी- २०२२/प्र.क्र.०९/विशि-३ दिनांक:- १६ जून, २०२३

प्रति,

कुलगुरु,
सर्व अकृषि विद्यापीठे.

विषय- राज्यात नविन शैक्षणिक धोरण-२०२० ची अंमलबजावणी करणेबाबत.

संदर्भ- १. समक्रमांकित शासन निर्णय दिनांक २०.०४.२०२३ व दिनांक १६.०५.२०२३
२.शासनाचे समक्रमांकाचे दिनांक ०६.०६.२०२३ चे पत्र

महोदय,

उपरोक्त संदर्भांकित शासननिर्णयान्वये पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी शैक्षणिक अभ्यासक्रम व श्रेयांक आराखड्यासंदर्भात निर्देश जारी करण्यात आले असून, त्याबाबतच्या अंमलबजावणीच्या सूचना देण्यात आल्या आहेत. सदर प्रकरणी, सुकाणू समितीने शासनास सादर केलेल्या शिफारशींनुसार कार्यवाही करण्याबाबत संदर्भ क्र.२ येथील शासन पत्रान्वये आपणास कळविण्यात आले आहे.

नविन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० ची राज्यातील अंमलबजावणीच्या अनुषंगाने मा. मंत्री (उ.व तं.शि.) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०९.०६.२०२३ रोजी सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे सुकाणू समिती आणि कुलगुरु, सर्व अकृषि विद्यापीठे यांच्यासह झालेल्या बैठकीतील चर्चेच्या अनुषंगाने सुकाणू समितीने **सुधारीत शिफारशी** केल्या आहेत. त्यानुसार संदर्भाधीन दिनांक ०६.०६.२०२३ च्या पत्रान्वये यापुर्वी दिलेल्या सूचनांमध्ये बदल करण्यात येत असून **सुधारीत शिफारशींच्या** अनुषंगाने आपणास खालीलप्रमाणे कळविण्याचे मला आदेश आहेत:-

- **पदव्युत्तर अभ्यासक्रम**- शासन निर्णय, दिनांक १६ मे, २०२३ अन्वये दिलेले निर्देश सन२०२३-२४ शैक्षणिक वर्षापासून राज्यातील सर्व विद्यापीठांमध्ये आणि महाविद्यालयांमध्ये अनिवार्यपणे स्वीकारले जातील आणि लागू केले जातील.
- **प्रथम वर्ष पदवी अभ्यासक्रम**- शासन निर्णय, दिनाक२० एप्रिल २०२३ अन्वये देण्यात आलेल्या निर्देशांची अंमलबजावणी सर्व विद्यापीठीय स्तरावर आणि स्वायत्त महाविद्यालयांमध्ये शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून लागू केले जातील.

  स्वायत्त महाविद्यालयांव्यतिरिक्त जर विद्यापीठाशी संलग्नित काही महाविद्यालयांना स्वतःहून राष्ट्रीय नविन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षापासून करावयाची असल्यास अशा महाविद्यालयांना त्यांच्या जवळच्या स्वायत्त महाविद्यालयाच्या मदतीने अंमलबजावणी करण्याची मुभा देण्याबाबतचा निर्णय संबंधित विद्यापीठाने घ्यावा.
- विद्यापीठे आणि स्वायत्त महाविद्यालये विद्यापीठ अनुदान आयोगाने राष्ट्रीय उच्च शैक्षणिक पात्रता फ्रेमवर्क (NHEQF) संदर्भात निर्गमित केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांच्या अधीन (POs, PEO, LO) अभ्यासक्रम तयार करतील.
- शैक्षणिक दिनदर्शिका- संपूर्ण राज्यात एकसमानता आणण्यासाठी, शैक्षणिक वर्ष २०२३-२४ साठी पदवी अभ्यासक्रमाचे प्रथम वर्ष दि. १ जुले ते १५ जुले २०२३ दरम्यान सुरू होईल.

तथा कोणत्याही परिस्थितीत ते दि.१५ जुलै २०२३ च्या पुढे जाणार नाही. पदवी अभ्यासक्रमाचे द्वितीय व तृतीय वर्ष दि.१ ऑगस्ट २०२३ नंतरच्या तारखेपासून सुरू होईल.

- शैक्षणिक श्रेयांक पतपेढी- (Academic Bank of Credit) ची सर्व विद्यापीठे व महाविद्यालयांमध्ये परिणामकारक अंमबजावणी होणाच्या दृष्टीने सर्व विद्यार्थ्यांची प्रवेशाच्यावेळी न चुकता एबीसी पोर्टलवर नोंदणी करण्यात यावी.
- नविन शैक्षणिक धोरण-२०२० ची अंमलबजावणी विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या अस्वायत्त महाविद्यालयांमध्ये शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून अनिवार्यपणे केली जाईल. त्यानुषंगाने अभ्यासक्रम आराखडे, अभ्यासक्रम संरचना, मूल्यांकन पद्धती यांना अंतिम रूप देण्यासाठी सर्व विद्यापीठे, महाविद्यालये आणि वैधानिक प्राधिकरणे एकत्रितपणे शैक्षणिक आवश्यक पावले उचलतील आणि ३० सप्टेंबर, २०२३ पर्यंत सर्व सहभागींना संश्लेषित करतील. त्यासंदर्भात सूक्ष्म स्तरावर तपशीलवार नियोजन करुन संभाव्य समस्यां ओळखून अशा समस्यांचे निराकरण करण्याची, सर्व वैधानिक अनुपालन करण्याची कार्यवाही ३१ डिसेंबर, २०२३ पर्यंत पुर्ण केली जाईल.
- शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून राज्यात नविन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करण्याबाबतचा अंतिम निर्णय राज्य शासन आणि सर्व विद्यापीठे दिनांक १ जानेवारी, २०२४ रोजी घोषित करतील.
- विद्यापीठ अनुदान आयोगाकडून राज्यातील काही महाविद्यालयांना नव्याने स्वायत्तता दिली आहे. अशा स्वायत्त महाविद्यालयांना दि.३० जून,२०२३ पर्यंत अंतिम मान्यता देण्यासाठीची कार्यवाही संबंधित विद्यापीठांनी जलदगतीने करावी. शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून स्वायत्तता प्राप्त करणा-या अशा सर्व नवीन स्वायत्त महाविद्यालयांना शासन निर्णय दिनांक २०.०४.२०२३मध्ये नमूद केल्यानुसार अभ्यासक्रम व श्रेयांक आराखडे स्विकारणे व त्यानुसार अंमलबजावणी करणे अनिवार्य राहील.

आपला,

(अ.म. बाविस्कर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१.अध्यक्ष, सुकाणू समिती (एनईपी)
२. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे तथा सदस्य सचिव, सुकाणू समिती (एनईपी)